www.sgbauonline.com



# B.A. (Part-I) (Semester-I) Examination

## Optional Subjects

## RASHTRASANT TUKDOJI THOUGHT

## Rashtrasantaache Jeevan V Karya (New Syllabus)

वेळ—तीन तास] [एकूण गुण—80

सूचना :—(1) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य.

(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

(3) प्रश्न क्र. 5 मधील सर्व बहुपर्यायी प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

1. बालपणा पासून तालबर्डी महायज्ञा पर्यंतचा राष्ट्रसंत तुकडोजींचा जीवनपट उलगडा. 16

किंवा

महात्मा गांधींच्या आश्रमात तुकडोजींचा निवास हा अध्यात्म आणि देशभक्ती यांच्या संयोगाला कसा कारणीभूत झाला ते विस्ताराने सांगा. 16

2. राष्ट्रसंत तुकडोजींच्या बेचाळीसच्या क्रांतीयुद्धातील विधायक सहभागाची सविस्तर चर्चा करा. 16

किंवा

हैदराबाद मुक्ती संग्रामातील रझाकारांच्या बंदोबस्तासाठी तसेच तेथील जनतेला भयमुक्त करण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजींनी केलेले कार्य स्पष्ट करा. 16

3. थोडक्यात उत्तरे द्या :

(1) राष्ट्रसंत तुकडोजींनी अंधश्रद्धा व बळीप्रथांचे उच्चाटन कशा प्रकारे केले ? 4

(2) राष्ट्रसंतांनी उपेक्षित, वंचित, दुर्बल घटकांत धर्मविषयक जागृती केली—स्पष्ट करा. 4

(3) राष्ट्रसंत तुकडोजींनी पंढरपुरात अस्पृश्यांसह मंदिर प्रवेश कसा केला ? विशद करा. 4

(4) राष्ट्रसंतांची कुंभमेळ्यातील साधुसंतांच्या मतपरिवर्तना विषयीची भूमिका सांगा. 4

किंवा

(1) राष्ट्रसंत तुकडोजींनी हिंदू-मुस्लिम ऐक्य साधण्यासाठी अमरावतीमध्ये कोणता उपक्रम राबविला ? 4

(2) राष्ट्रसंत तुकडोजींच्या अस्पृश्यता उच्चाटण विषयक कार्याचा आढावा घ्या. 4

(3) अमरावती येथील तपोवन कुष्टधामाचे भूमिपूजन राष्ट्रसंत तुकडोजींनी केले, का केले, कसे केले ते स्पष्ट करा. 4

(4) राष्ट्रसंत तुकडोजी कृतीशील समाज सुधारक होते. स्पष्ट करा. 4



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

4. थोडक्यात उत्तरे द्या :

(1) राष्ट्रीय शिक्षण संस्था व मानव संसाधन यांच्यातील सहसंबंध स्पष्ट करा. 4

(2) राष्ट्रसंत तुकडोजींचे औपचारिक शिक्षणासंदर्भातील विचार सांगा. 4

(3) राष्ट्रसंत तुकडोजींचे शिक्षणक्षेत्रातील जीवनमूल्य संवर्धना बाबतीतील विचार सांगा. 4

(4) चातुर्मास्य व अन्य शिबिरांमधून सैनिकी शिक्षण देण्यामागची राष्ट्रसंत तुकडोजींची भूमिका स्पष्ट करा. 4

किंवा

(1) 'स्वतंत्र महिला संघटनाद्वारे स्त्री शक्ती संवर्धन होऊ शकते'—या संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजींचे विचार स्पष्ट करा. 4

(2) गोपाळराव आगरकरांचे स्त्री मुक्ती संदर्भातील कार्य स्पष्ट करा. 4

(3) प्रशासन-व्यवस्थापनासाठी विद्वान व कुशल महिला कार्यकर्त्यांची नेमणूक करण्या मागील राष्ट्रसंतांची भूमिका सांगा. 4

(4) सावित्रीबाई फुलेंच्या स्त्री मुक्ती कार्याचा आढावा घ्या. 4

5. योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(1) माणूस द्या मज माणूस द्या हे भजन कुणी लिहिले ?

(संत नामदेव/राष्ट्रसंत तुकडोजी/संत तुकाराम) 2

(2) ______ ग्राम पूर्ण व्हावे स्वच्छ सौंदर्यवान ।
कोणाहि घरी गलिच्छपण । न दिसावे कोठे । (रामधूनपूर्वी/सूर्योदयापूर्वी/उषःकालापूर्वी) 2

(3) राष्ट्रसंत तुकडोजींनी सामाजिक भेदभावांचा ______ केला. (पुरस्कार/विरोध/स्वीकार) 2

(4) लोक दिंड्या-मिरवणुकी काढती । परि त्यांचे तत्त्वचि आता न जाणती । म्हणोनि झाली ______ अति ।
दारोदारी घरोघरी ।। (गलिच्छता/अस्वच्छता/दांभिकता) 2



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

(5) सर्वांनी स्वच्छ, शिस्तबद्ध व्हावे। परस्परांशी ______ करावे। तरीच गाव स्वर्ग व्हावे। सर्वतोपरी।

(सहकार्य/प्रेम/मित्रत्व)

2

(6) 'कशाला काशी जातो रे बाबा' हे भजन कुणाचे ?

(संत तुकाराम/संत एकनाथ/राष्ट्रसंत तुकडोजी)

2

(7) राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेत पुरस्कारलेली सर्वजनांना सुख सुविधांची हमी देणारी समाज व्यवस्था ______ या नावाने ओळखली जाते.

(भूवैकुंठ/आदर्श राज्य/रामराज्य)

2

(8) नगर प्रदक्षिणेची प्रथा। ती प्रिय होती अनेक पंथां।

तेहि गेली लयाला आता। उरले सगळे ______ ।।

(दरिद्रीपण/दुर्बळपण/करंटेपण)

2



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

www.sgbauonline.com